Pune Police

सत्यमेव जयते

दि. १०/१२/२०१८

प्रसनोट

**आंबेगांव पठारावरील खुनाच्या गुन्हयातील ८ आरोपी भारती विदयापिठ पोलीसांच्या जाळयात**

भारती विदयापिठ पोलीस स्टेशन कार्यक्षेत्रात दि. ०६/१२/२०१८ रोजी सायंकाळी २२:०० वाजण्याच्या दरम्यान विनायक मारूती पवार, वय २३, रा. शनिनगर, पुणे या युवकाची कोयत्याने वार करून व डोक्यात जात्याचा दगड मारून टोळकयाने हत्या केल्याबाबत गु.रजि.क्र. ६५७/२०१८, भा.द.वि. कलम ३०२, १४३, १४७, १४८, १४९, आर्म्स अॅक्ट ४ (२५) व महा. पो. अधि. कलम ३७(१)(३) सह १३५ प्रमाणे गुन्हा दाखल झाला.

सदर गुन्हा घडताच भारती विदयापिठ पोलीस ठाण्याचे व.पो.नि. श्री विष्णु पवार यांनी मा. वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली वेगाने सुत्रे फिरवुन तपासपथक मधिल अधिकारी व स्टाफची वेगवेगळी पथके करून तपास कामी संभाव्य संशयित ठिकाणी रवाना केली.

भारती विदयापिठ पोलीस स्टेशन तपासपथकातील नेमणुकीस असलेले पो.कर्मचारी श्री कुंदन शिंदे व श्री राहुल तांबे यांना त्यांच्या खास बातमीदारा करवी गुन्हयातील मुळ सुत्रधार गणेश गायकवाड व त्याचा गुन्हयातील साथीदार शुभम सुर्यवंशी हा वंडरसिटी, पुणे–मंबई हायवे, पुणे येथे त्यांचे मित्रास भेटण्याकरीता येणार असल्याची बातमी प्राप्त झाली. त्या अनुषंगाने सहा पोलीस निरीक्षक श्री चिवडशेटटी यांनी तपासपथकाचे स्टाफसह सापळा लावुन दोघांना ताब्यात घेतले. त्याचेकडे दाखल गुन्हयाच्या अनुषंगाने चौकशी केली असता, दोघांनी गुन्हयाची कबुली दिली. त्यांना दि. ०८/१२/२०१८ रोजी अटक करण्यात आली आहे.

त्यानंतर तपासपथकात नेमणुकीस असलेले पो.ना./सर्फराज देशमुख व पो.शि./राहुल तांबे यांनी अहोरात्र मेहनत करून गुन्हयातील पाहिजे आरोपीत कोठे लपले आहेत याबाबत गुप्त माहिती मिळविली, त्यास पो.शि./गणेश चिंचकर यांनी केलेल्या तांत्रिक सहकार्याने गुन्हयतील पाहिजे आरोपीत नेमके लपुन बसल्याचे ठिकाण निश्चीत करून एकुण ६ आरोपीत नामे १) विशाल बाळासाहेब कांबळे, वय २२, रा. शंकरमहाराज वसाहत धनकवडी, पुणे, २) प्रकाश उर्फ आण्णा विठ्ठल रेणुसे, वय २५, रा. सदर, ३) योगेश बाळु शेंडकर, वय २०, रा. सदर, ४) गौरव उर्फ गोग्या गोविंद भामरे, वय २६, रा. सदर, ५) गणेश मारूती पोटे, वय २० रा. नारायणपुर, पुरंदर, पुणे, ६) आदित्य तानाजी चौधरी, वय १९, रा. नारायणपुर, पुरंदर, पुणे यांना मु.पो.काशिळ, ता.जि.सातारा येथुन सहा. पोलीस निरीक्षक चिवडशेटटी, पो.हवा./बढे, पो.ना./सर्फराज देशमुख, पो.ना./सचिन पवार, पो.शि./राहुल तांबे यांनी कौशल्याने ताब्यात घेतले. त्यांना भारती विदयापिठ पोलीस स्टेशन येथे आणुन त्यांना विश्वासात घेवुन त्यांच्याकडे घडलेल्या गुन्हयाबाबत चौकशी करता, त्यांनी सदर गुन्हा केल्याची कबुली दिल्याने त्यांना दि. १०/१२/२०१८ रोजी दुपारी १४:१५ वाजता अटक करण्यात आली आहे.

आज वर गुन्हयाचे तपासात गुन्हयाचे तपासिक अंमलदार सहा पोलीस निरीक्षक श्री मधुकर सांळुखे यांनी एकुण ८ आरोपीत अटक केले असुन, अटक आरोपीतांना मा. न्यायालयाने दि. १४/१२/२०१८ रोजी पावेतो पोलीस कोठडी मंजुर केली आहे.

सदर गुन्हयातील अटक आरोपीतांकडे विश्वासात घेवुन गुन्हयाचे अनुषंगाने चौकशी करता, अटक आरोपीत विशाल बाळासाहेब कांबळे याचा चुलता नामे संतोष सोमनाथ कांबळे याचा सन २०१२ साली खुन झाला होता. सदर खुनातील आरोपीत अविनाश महादेव घोडके हा संचित रजेवर आल्यावर गुन्हयातील मयत इसम विनायक मारूती पवार हा त्याचे कायम सोबत असायचा, तसेच अविनाश घोडके याची सर्व बडदास्त ठेवायचा, त्यामुळे गुन्हा करणा–या सर्व आरोपीतांना त्याचा राग मनात होता. तसेच अटक आरोपीतांपैकी बरेचसे आरोपीत हे पुर्वीच्या गुन्हयांमध्ये एकमेकांचे सह आरोपी आहेत. केवळ बदला घेण्याच्या हेतुनेच संधी प्राप्त होताच आरोपीतांनी हा गुन्हा केला असल्याची माहिती चौकशीत पुढे आली आहे.

एकंदरीत गुन्हयातील अटक आरोपीतांकडे केलेल्या चौकशीत काही बाबी समजल्या, त्यात सन २००५ साली कुख्यात गुंड अविनाश घोडके, संतोष उर्फ घास्लेट संत्या कांबळे व त्यांच्या सहका–यांनी त्यांच्यावर सहकारनगर पोलीस स्टेशन येथे बलात्काराचा गुन्हा दाखल झाल्याच्या रागातुन शंकरमहाराज वसाहत भागात घोडके, संतोष उर्फ घास्लेट संत्या कांबळे यांनी माळी नावाच्या इसमाची हत्या केली होती. – सदर घटनेनंतर सन २००९ मध्ये गोग्या भामरे व त्याच्या सहका–यांनी माळीच्या भावाची हत्या केली होती. – वरील माळी व त्याच्या भावाची हत्या झाल्याच्या प्रकरणात जामिन झाल्यानंतर अविनाश घोडके आणि संतोष उर्फ घास्लेट संत्या कांबळे यांच्यात बिनसल्यामुळे अविनाश घोडके आणि त्यांच्या सहका–यांनी सन २०१२ साली संतोष उर्फ घास्लेट संत्या याचा खुन केला होता. – त्यानंतर संतोष उर्फ घास्लेट संत्या कांबळे याचेशी मैत्रि असल्याच्या कारणावरून संतोष उर्फ संत्याघास्लेट कांबळे याचा मित्र नितीन येळे याचाही शंकर महाराज वसाहतीत राहणा–या सराईत गुंडांनी खुन केला होता. – घास्लेट संत्याच्या खुन प्रकरणामध्ये गुंड अविनाश घोडके व त्याचे साथीदार येरवडा जेल येथे जन्मठेपेची शिक्षाची शिक्षा भोगत आहे. शिक्षा भोगत असताना गुंड अविनाश घोडके हा पॅरोल रजेवर आल्यानंतर गुंड अविनाश घोडकेची सर्व बडदास्त हा सध्याच्या भारती विदयाविठ पोलीस स्टेशन मधिल दाखल खुनाच्या गुन्हयातील मयत विनायक पवार हा ठेवत होता, सदर बाब गुन्हयातील अटक आरोपीतांना सहन होत नव्हती. यावरूनच गुन्हयात अटक आरोपीत गणेश गायकवाड याचे सोबत विनायक पवार याचे सोबत झालेल्या तत्कालीन भांडणाच्या कारणावरून संधी मिळताच मागिल घास्लेटसंत्या कांबळे याच्या खुनाचा राग मनात धरून, गुन्हयातील सर्व आरोपीतांनी मिळुन विनायक पवार याचा खुन केला आहे.

सदरची कामगिरी पश्चिम विभागाचे अप्पर पोलीस आयुक्त मा. श्री रविंद्र सेनगांवकर, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ २ श्री बच्चन सिंह, स्वारगेट विभागाचे सहा पोलीस आयुक्त श्री रविंद्र रसाळ, भारती विदयापिठ पोलीस स्टेशनचे वपोनि/श्री विष्णु पवार, पोलीस निरीक्षक (गुन्हे)/श्री विष्णु ताम्हाणे यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि/मधुकर साळुंखे, सपोनि/चिवडशेट्टी, पोउपनिरी/गायकवाड, पो.हवा./कृष्णा बढे, पो.ना./सर्फराज देशमुख, पो.ना./सचिन पवार, पो.शि./कुंदन शिंदे, पो.शि./राहुल तांबे, पो.शि./गणेश चिंचकर, पो.शि./महेश मंडलिक, पो.शि./नितीन जाधव, पो.शि./विनोद शिर्के, पो.हवा./श्रीधर पाटील, पो.शि./समिर बाशिराज, पो.शि./स्वप्निल शर्मा यांनी केली आहे.

(विष्णु ताम्हाणे)
पोलीस निरीक्षक (गुन्हे)
भारती विदयापिठ पोलीस स्टेशन, पुणे

